16 MAR 2026
लोकमत

# चंद्रकांत पाटील मराठी साहित्याचे राखणदार : गवस

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** ज्येष्ठ समीक्षक चंद्रकांत पाटील मराठी साहित्याच्या पिकाचे राखणदार आहेत, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांनी मंगळवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार ज्येष्ठ समीक्षक चंद्रकांत पाटील यांना हा पुरस्कार देण्यात आला. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे अध्यक्षस्थानी होते. गवस पुढे म्हणाले, 'खेड्यापाड्यांतील लिहित्या मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याचे काम पाटील यांनी केले. यावेळी मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. सुखदेव एकल, डॉ. दिलीप धोंडगे, प्रा. प्रवीण बांदेकर, कृष्णात खोत, डॉ. एकनाथ पगार, आशुतोष पाटील, वीरधवल परब, डॉ. अवनीश पाटील, डॉ. मेघा पानसरे, गौतमी पुत्रकांबळे उपस्थित होते.

16 MAR 2026 तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'भंगार' कचरावेचक मुलांची संघर्षमय कहानी

- अशोक जाधव यांचे प्रतिपादन
- शिवाजी विद्यापीठात 'भंगार' पुस्तकावर चर्चासत्र

कोल्हापूर

भंगार ही उकिरड्यावर भंगार वेचून जगणाऱ्या मुलाची संघर्षमय कहानी आहे, असे प्रतिपादन भंगार आत्मकथनाचे लेखक अशोक जाधव यांनी केले. ते शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागात पारंपरिक दिनाच्या समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. ते म्हणाले, हे पुस्तक उकिरड्यावर भंगार वेचून जगणाऱ्या समाजाचे जीवन, मुलांची परिस्थिती, आणि शिक्षण घेऊन पुढे जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या प्रत्येकाची कहाणी आहे. भंगार हे संयमाचे उत्तम उदाहरण आहे. मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. रणधीर शिंदे म्हणाले, मराठी साहित्यात उपेक्षितांचे जग वाचकांसमोर ठेवणाऱ्या काही महत्वाच्या पुस्तकांमध्ये अशोक जाधव यांच्या भंगार या पुस्तकाच्या उल्लेख करावा लागतो. माणसाला माणूसपणाची ओळख आणि भान देण्याचे काम अशोक जाधव यांनी लेखनातून केले आहे.संजना शेरखाने यांनी स्वागत केले. सानिका सावंत यांनी सूत्रसंचालन केले. सुरज गवळी यांनी आभार मानले. यावेळी डॉ. साठे, डॉ. एकल, विद्यार्थी उपस्थित होते.

16 MAR 2026

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राष्ट्रीय युवा महोत्सवात विद्यापीठाचा संघ अव्वल

## चेन्नईमध्ये पटकावले सर्वसाधारण विजेतेपद

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** नवी दिल्लीच्या असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज आयोजित चेन्नई येथील सत्यभामा विद्यापीठात दि. १० ते १४ फेब्रुवारी या कालावधीत पार पडलेल्या राष्ट्रीय युवा महोत्सवात शिवाजी विद्यापीठाच्या संघाने सुवर्णयश मिळविले. या महोत्सवात एकूण २९ सदस्यांचा संघ सहभागी झाला होता.




चेन्नई येथील सत्यभामा विद्यापीठात पार पडलेल्या राष्ट्रीय युवा महोत्सवात शिवाजी विद्यापीठाच्या संघाने यश मिळविले.

या महोत्सवात शिवानी विद्यापीठाच्या संघाने मातीकाम मध्ये प्रथम, रांगोळीमध्ये प्रथम, हिंदी वक्तृत्व स्पर्धेत प्रथम, सांस्कृतिक शोभायात्रेत द्वितीय, पाश्चिमात्य एकल गायन स्पर्धेत द्वितीय, पाश्चिमात्य समूह गायन स्पर्धेत द्वितीय, सुगम गायन स्पर्धेत द्वितीय, शास्त्रीय तालवाद्य स्पर्धेत तृतीय व्यंगचित्र स्पर्धेत पंचम तसेच ललितकला विभागाचा सर्वसाधारण विजेतेपदाचा चषक विद्यापीठास मिळाला आहे. या राष्ट्रीय युवामहोत्सव विद्यापीठ संघास प्रभारी कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी, प्रकुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. बबन माने, संग्राम भालकर, प्रा. प्रमोद पाटील, ऋषिकेश देशमाने, नितीन शिंदे, गणेश इंडीकर, सुमंत कुलकर्णी आणि चैतन्य देशपांडे हे तज्ज्ञ मार्गदर्शक होते. यावेळी संघव्यवस्थापक डॉ. प्रमोद कसबे, महिला संघव्यवस्थापक डॉ. संजीवनी पाटील, विजय इंगवले उपस्थित होते.

15 MAR 2026
लोकमत

# विद्यापीठात यशवंतराव चव्हाण यांना अभिवादन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात गुरुवारी पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. सकाळी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

15 MAR 2026

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राज्यशास्त्राचे शिक्षण आणि प्रत्यक्ष राजकारणात तफावत - डॉ. पी. डी. देवरे

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी



डॉ. रवींद्र भणगे यांच्या 'भूराजकारण, तंत्रज्ञान आणि भविष्यातील जागतिक व्यवस्था' या पुस्तकाचे प्रकाशन करताना डॉ. पी. डी. देवरे. सोबत डॉ. टी. एम. पाटील, डॉ. अरुण चव्हाण, डॉ. भारती पाटील, डॉ. व्ही. एम. पाटील, डॉ. भणगे, डॉ. शिरीषकुमार पवार.

कोल्हापूर : विद्यापीठांमध्ये राज्यशास्त्राचे सिद्धान्त, संकल्पना आणि विचारधारा शिकविल्या जातात; मात्र प्रत्यक्ष राजकारण आणि समाजव्यवहार यामध्ये मोठी तफावत दिसून येते. ती समजून घेऊन विद्यार्थ्यांना आणि समाजाला वास्तव परिस्थिती समजावून सांगणे ही राज्यशास्त्रज्ञ, प्राध्यापकांची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ राजकीय विचारवंत डॉ. पी. डी. देवरे यांनी शुक्रवारी येथे केले.

'राज्यशास्त्रातील नवीन प्रवाहांचे चर्चाविश्व' या विषयावर शिवाजी विद्यापीठात आयोजित दोनदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रामध्ये बीजभाषक देवरे बोलत होते. त्यांनी बदलत्या सामाजिक-राजकीय परिस्थितीत विचारप्रवाहांची नवी मांडणी करण्याची गरज अधोरेखित केली.

शिवाजी विद्यापीठाचा राज्यशास्त्र अधिविभाग, नेहरू अभ्यास केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यशास्त्र परिषदेचे ३१ वे अधिवेशन आणि दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आज उद्घाटन झाले. मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांच्या हस्ते उद्घाटन झाले. प्राचार्य व्ही. एम. पाटील उद्घाटन समारंभाचे, तर डॉ. भारती पाटील बीजभाषण सत्राच्या अध्यक्षस्थानी होत्या.

राज्यशास्त्रातील सिद्धान्त आणि प्रत्यक्ष राजकीय व्यवहार यामध्ये वाढत चाललेली विसंगती समजून घेणे आणि त्यावर नव्या पद्धतीने विचारमंथन करणे अत्यावश्यक असल्याचे देवरे यांनी नमूद केले. डॉ. रवींद्र भणगे यांनी प्रास्ताविक, डॉ. नेहा वाडेकर यांनी परिचय, डॉ. दत्ता सावंत यांनी सूत्रसंचालन, डॉ. सुखदेव उंदरे यांनी आभार मानले. कार्यक्रमास शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र परिषदेचे अध्यक्ष डॉ. टी. एम. पाटील, डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. श्रीराम पवार, डॉ. शिवाजी पाटील, डॉ. बाळासाहेब भोसले, डॉ. बी. बी. पाटील, सिकंदर जमादार उपस्थित होते.

15 MAR 2026 जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संत तुकाराम मानवांच्या कल्याणाचा विचार करणारे महान संत

● ह. भ. प. उल्हास पाटील यांचे प्रतिपादन

**जनप्रवास : कोल्हापूर**

संत तुकाराम हे मानवजातींच्या कल्याणाचा विचार करणारे महान संत आहेत, असे प्रतिपादन ह. भ. प. उल्हास पाटील यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या संत तुकाराम अध्यासनाच्या वतीने आयोजित संत तुकाराम व्याख्यानमालेअंतर्गत संत तुकारामांचा मानवतावाद या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे अध्यक्षस्थानी होते.

यावेळी उल्हास पाटील म्हणाले, समाजाचा दडपलेला आवाज उठवणारा संत म्हणून तुकारामांकडे पाहिले जाते. गुलामगिरीविरूध्द लढण्याची प्रेरणा संत तुकाराम यांच्या मानवतावादातून मिळते. संत तुकारामांचे अभंग माणसाला माणूस बनविण्याचे काम करतात. संत



कोल्हापूर : संत तुकारामांचा मानवतावाद या विषयावर बोलताना ह. भ. प. उल्हास पाटील. सोबत अन्य मान्यवर.

तुकारामांची भक्ती केवळ धार्मिक स्वरूपाची नसून ती सामाजिक, समता, करूणा आणि मानवतेचा व्यापक संदेश देणारी आहे.

कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे अध्यक्षीय मनोगतात म्हणाले की, संत तुकारामांच्या अभंगातील मानवतावादी विचार समजून घेतला पाहिजे आणि संत साहित्याच्या अभ्यासातून प्रेरणा घेऊन समाजातील भेदभाव, अंधश्रध्दा आणि अन्याय दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. प्रास्ताविक संत तुकाराम अध्यासनाचे समन्वयक प्रा. डॉ. नंदकुमार मोरे यांनी केले. यावेळी मराठी विभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे प्रमुख उपस्थित होते. सूत्रसंचालन भक्ती नाईक यांनी केले. तर अमोल देशमुख यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी प्रा. टी. एस. पाटील, अवनीश पाटील, अक्षय सरवदे, शिवकुमार सोनाळकर, दशरथ पारेकर, मांतेश हिरेमठ, प्रकाश दुकळे आदी मान्यवर उपस्थित होते.

16 MAR 2026
सकाळ

# शिक्षणशास्त्र विभागाची कार्यशाळा

**कोल्हापूर:** 'जनरेशन झेड अध्ययनार्थींमध्ये बुद्धीगुणांक, भावनिक बुद्धिमत्तेबरोबरच मानसिक स्थैर्याकडे संक्रमण करण्याची गरज आहे', असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या आंतरविद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. अजय साळी यांनी केले. विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागाने घेतलेल्या 'नावीन्यपूर्ण अध्यापनशास्त्र' या विषयावरील कार्यशाळेत ते बोलत होते. त्यांनी भावी शिक्षकांना अध्यापन प्रक्रियेत येणाऱ्या आव्हानांबाबत मार्गदर्शन केले. शिक्षकांची बदलती भूमिका स्पष्ट केली. अधिविभागप्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे यांनी विद्यापीठीय शिक्षणाचे व सर्वांगीण विकासाचे महत्त्व सांगितले. शिक्षकाला पार पाडावयाच्या विविध संवेदनशील भूमिकांबाबत मार्गदर्शन केले. डॉ. विद्यानंद खंडागळे यांनी कार्यशाळेचा हेतू स्पष्ट केला. पाचव्या औद्योगिक क्रांतीमधील अध्ययनार्थींसाठी नावीन्यपूर्ण अध्यापन पद्धतीची गरज स्पष्ट केली. कार्यशाळेत सांगली, गारगोटी, गडहिंग्लज येथील महाविद्यालयातील शिक्षक, विद्यार्थी सहभागी झाले.

16 MAR 2026

जनप्रवास

# नाविन्यपूर्ण अध्यापनशास्त्र विषयावर विद्यापीठात कार्यशाळा

जनप्रवास : कोल्हापूर

शिक्षणशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे नाविन्यपूर्ण अध्यापनशास्त्र या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा झाली. या कार्यशाळेच्या अनुषंगाने शिवाजी विद्यापीठाच्या आंतरविद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. अजय साळी यांनी "जनरेशन झेड" या विषयावर भावी शिक्षकांना अध्यापन प्रक्रियेत येणाऱ्या आव्हानांवर चर्चा केली व शिक्षकाची बदलती भूमिका स्पष्ट करताना त्यांनी "जनरेशन झेड" अध्ययनार्थींमध्ये बुद्धीगुणांक, भावनिक बुद्धिमत्ते बरोबरच मानसिक स्थैर्याकडे संक्रमण करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन केले.

यावेळी अधिविभागप्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे यांनी विद्यापीठीय शिक्षणाचे व सर्वांगीण विकासाचे महत्त्व विशद करताना शिक्षकाला पार पाडावयाच्या विविध संवेदनशील भूमिकांवर चर्चा केली. डॉ. विद्यानंद खंडागळे यांनी कार्यशाळेचा हेतू स्पष्ट केला व पाचव्या औद्योगिक क्रांतीमधील अध्ययनार्थींसाठी नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धतीची गरज स्पष्ट केली. या कार्यशाळेसाठी शिवाजी विद्यापीठ संलग्नित सांगली, गारगोटी, गडहिंग्लज, कोल्हापूर शहरातील अध्यापक, शिक्षक प्रतिनिधी व विद्यार्थी सहभागी झाले होते. सुप्रिया पाटील यांनी सूत्रसंचालन केले. रूपाली संकपाळ, सरस्वती कांबळे, सारिका पाटील, विद्यार्थी उपस्थित होते.



## प्रतिकृती तयार करण्याचे प्रशिक्षण

कार्यशाळेसाठी साधन व्यक्ती म्हणून सतीश कुंभार यांनी प्रत्यक्ष अनुभवाद्वारे विविध अध्यापनासाठी वापरल्या जाणाऱ्या प्रतिकृती तयार करण्याचे प्रशिक्षण सहभागी विद्यार्थ्यांना दिले.

16 MAR 2026 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापुरातच कलेचे उच्च शिक्षण मिळण्यासाठी प्रयत्नशील

## प्र. कुलगुरू डॉ. ज्योती जाधव : 'गुरुशिष्य' कला प्रदर्शनाचे उद्‍घाटन

कोल्हापूर, ता. १५ : 'कलेचे उच्च शिक्षण कोल्हापुरातच मिळावे यासाठी प्रयत्नशील आहे. कला परंपरा जपणाऱ्या कॉलेजनी तसे प्रस्ताव शिवाजी विद्यापीठाकडे दिले तर सकारात्मक विचार करू', अशी ग्वाही शिवाजी विद्यापीठाच्या प्र. कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी दिली. गुरुवर्य टी. के. वडणगेकर यांच्या २६ व्या स्मृतिदिनानिमित्ताने आयोजित 'गुरुशिष्य' कला प्रदर्शनाचे उद्‍घाटन त्यांच्या हस्ते झाले. यावेळी त्या बोलत होत्या. दसरा चौक येथील शाहू स्मारक भवन कला दालनात झालेल्या या कार्यक्रमास आर्किटेक्ट गजेंद्र साबळे यांची प्रमुख उपस्थिती होती.



कोल्हापूर : गुरु शिष्य प्रदर्शनात रविवारी दुर्गा आजगांवकर यांना के. आर. कुंभार उपक्रमशील युवा कलाकार पुरस्कार प्रदान करताना शिवाजी विद्यापीठाच्या प्रकुलगुरू डॉ ज्योती जाधव. यावेळी उपस्थित डावीकडून शुभम कुंभार, अजेय दळवी, उदय कुंभार, आर्किटेक गर्जेंद्र साबळे, विजय टिपुगडे, मनोज दरेकर, नागेश हंकारे आदी.

डॉ. जाधव म्हणाल्या, 'कलाकार आहेत म्हणून समाज आहे. कोल्हापूरला कलेची मोठी परंपरा आहे. आता बदलत्या काळाबरोबर कला शिक्षणही व्यापक झाले पाहिजे. विद्यार्थ्यांना सुविधा नाही म्हणून अन्य शहरांत शिकायला जायला लागू नये, असे मला वाटते. इथे मोठी परंपरा असणारी महाविद्यालये आहेत, त्यांनी पदवी, पदव्युतर शिक्षण मिळाले पाहिजे. त्यासाठी प्रस्ताव द्या, त्यात काही त्रुटी असतील तर त्या दूर करून लवकरात लवकर अभ्यासक्रम कसे सुरू करता येतील ते पाहू.' दरम्यान, शहर पोलिस उपअधीक्षक प्रिया पाटील यांनी प्रदर्शनास भेट दिली.

प्राचार्य अजेय दळवी यांनी स्वागत केले. प्राचार्य मनोज दरेकर यांनी प्रास्ताविक केले. नागेश हंकारे यांनी सूत्रसंचालन केले. विजय टिपुगडे यांनी आभार मानले.

प्रदर्शनात विजय टिपुगडे, अजेय दळवी, विलास बकरे, संतोष पोवार, मनोज दरेकर, बबन माने, नागेश हंकारे, अभिजित कांबळे, प्रवीण वाघमारे, गजेंद्र वाघमारे, पूनम राऊत, शुभम चेचर, दुर्गा आजगांवकर, विजय उपाध्ये, राज इंचनाळकर, पुष्कराज मेस्त्री, सुदर्शन वंडकर, सर्वेश देवरुखकर, शैलेश राऊत, भाऊसाहेब पाटील, रमजान मुल्ला, शुभम कुंभार, ज्ञानेश पोवार, प्रकाश मोहिते, राहुल रेपे, आरिफ तांबोळी, अनंत भोगटे, अजय ढवळे, ओंकार राऊत, देवयानी देवरुखकर, विवेक कवाळे, शशांक घाटगे यांच्या कलाकृतींचा समावेश आहे. हे प्रदर्शन शनिवार (ता. २१) पर्यंत सकाळी १० ते ८ वाजेपर्यंत सर्वांसाठी विनामूल्य खुले आहे.

### दुर्गा आजगांवकर यांना युवा कलाकार पुरस्कार

■ प्रदर्शनात चित्रकार दुर्गा आजगांवकर यांना के. आर. कुंभार उपक्रमशील युवा कलाकार पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. प्र. कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते त्यांना गौरविण्यात आले.

16 MAR 2026
लोकमत

# शिवाजी विद्यापीठात आता कलेचे उच्चशिक्षण : ज्योती जाधव

## प्रस्ताव देण्याची सूचना, गुरुशिष्य प्रदर्शनाचे कोल्हापुरात उदघाटन

**कोल्हापूर :** कोल्हापूरला कलेची मोठी परंपरा आहे. आता बदलत्या काळाबरोबर कला शिक्षणही व्यापक झाले पाहिजे. विद्यार्थ्यांना सुविधा नाही म्हणून अन्य शहरात शिकायला जायला लागू नये. कला महाविद्यालयांनी पदवी, पदव्युतर शिक्षण मिळाले पाहिजे यासाठीचा प्रस्ताव द्यावा, त्यात काही त्रुटी असतील तर त्या दूर करून लवकरात लवकर अभ्यासक्रम सुरू करण्याचा प्रयत्न करू, अशी ग्वाही शिवाजी विद्यापीठाच्या प्र. कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी रविवारी दिली.

गुरुवर्य टी. के. वडणगेकर यांच्या २६ व्या स्मृती दिनानिमित्ताने आयोजित 'गुरुशिष्य' कला प्रदर्शनाच्या उदघाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. दसरा चौक येथील शाहू स्मारक भवन कला दालनात झालेल्या या कार्यक्रमाला आर्किटेक्ट गजेंद्र साबळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी चित्रकार दुर्गा आजगांवकर यांना के. आर. कुंभार उपक्रमशील युवा कलाकार पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. प्राचार्य अजेय दळवी यांनी स्वागत, प्राचार्य मनोज दरेकर यांनी प्रास्ताविक, नागेश हंकारे यांनी सूत्रसंचालन केले. विजय टिपुगडे यांनी आभार मानले. या प्रदर्शनात विजय टिपुगडे, अजेय दळवी, विलास बकरे, संतोष पोवार, मनोज दरेकर, नागेश हंकारे आदींच्या कलाकृतींचा समावेश आहे. प्रदर्शन शनिवारपर्यंत सकाळी १० ते ८ वाजेपर्यंत खुले आहे.

15 MAR 2026 तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘संत तुकारामांचे अभंग माणसाला माणूस बनविणारे’

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

संत तुकारामांचे अभंग माणसाला माणूस बनविण्याचे काम करतात. संत तुकाराम हे मानवजातीच्या कल्याणाचा विचार करणारे महान संत आहेत, असे प्रतिपादन ह. भ. प. उल्हास पाटील यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या संत तुकाराम अध्यासनाच्या वतीने आयोजित संत तुकाराम व्याख्यानमालेंतर्गत संत तुकाराम यांचा मानवतावाद या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे अध्यक्षस्थानी होते.

उल्हास पाटील म्हणाले, समाजाचा दडपलेला आवाज उठवणारा संत म्हणून तुकारामांकडे पाहिले जाते. गुलामगिरीविरूध्द लढण्याची प्रेरणा संत तुकाराम यांच्या मानवतावादातून मिळते. संत तुकारामांची भक्ती केवळ धार्मिक स्वरूपाची नसून ती सामाजिक, समता, करूणा आणि मानवतेचा व्यापक संदेश देणारी आहे.



**कोल्हापूर : कार्यक्रमात बोलताना उल्हास पाटील सोबत कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे आदी.**

संत तुकाराम अध्यासनाचे समन्वयक प्रा. डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रास्ताविक केले. भक्ती नाईक यांनी सुत्रसंचालन केले. अमोल देशमुख यांनी आभार मानले. यावेळी प्रा. टी. एस. पाटील, प्रा. अवनीश पाटील, प्रा. अक्षय सरवदे, प्रा. शिवकुमार सोनाळकर, प्रा. दशरथ पारेकर, प्रा. मांतेश हिरेमठ, प्रा. प्रकाश दुकळे आदी उपस्थित होते.

## ‘अन्याय दूर करण्याचा प्रयत्न करा’

संत तुकारामांच्या अभंगातील मानवतावादी विचार समजून घेतला पाहिजे आणि संत साहित्याच्या अभ्यासातून प्रेरणा घेऊन समाजातील भेदभाव, अंधश्रध्दा आणि अन्याय दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

– डॉ. व्ही. एन. शिंदे, कुलसचिव

16 MAR 2026
पुढारी

# कला शिक्षणासाठी प्रयत्नशील; प्रस्ताव आल्यास सकारात्मक निर्णय : प्र. कुलगुरू

कोल्हापूर : समृद्ध कला परंपरेचा वारसा जपणाऱ्या कोल्हापुरातच विद्यार्थ्यांना पदवी व पदव्युत्तर स्तरावर कला शिक्षण उपलब्ध व्हावे, यासाठी महाविद्यालयांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी केले. कला शिक्षणासाठी प्रस्ताव सादर झाल्यास त्याचा सकारात्मक विचार करून आवश्यक अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी विद्यापीठ सहकार्य करेल, अशी ग्वाही त्यांनी दिली. शाहू स्मारक भवन, कलादालन येथे आयोजित गुरुवर्य टी. के. वडणगेकर यांच्या २६ व्या स्मृतिदिनानिमित्त 'गुरुशिष्य' कला प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. कार्यक्रमात आर्कि. गजेंद्र साबळे आणि पोलिस उपअधीक्षक प्रिया पाटील यांची उपस्थिती होती. कार्यक्रमात चित्रकार दुर्गा आजगावकर यांचा 'के. आर. कुंभार उपक्रमशील युवा कलाकार' म्हणून सन्मान करण्यात आला. यावेळी प्राचार्य अजेय दळवी, प्राचार्य मनोज दरेकर, नागेश हंकारे, विजय टिपुगडे उपस्थित होते.

16 MAR 2026

पुण्यनगरी



# कलेचे उच्च शिक्षण कोल्हापुरातच मिळावे

## प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव; गुरू-शिष्य कला प्रदर्शनास प्रारंभ

**कोल्हापूर :** कलेचे उच्च शिक्षण कोल्हापुरातच मिळावे, यासाठी प्रयत्नशील आहे. कला-परंपरा जपणाऱ्या महाविद्यालयांनी तसे प्रस्ताव शिवाजी विद्यापीठाकडे दिले तर सकारात्मक विचार करू, अशी ग्वाही शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी दिली.

गुरुवर्य टी. के. वडणगेकर यांच्या २६ व्या स्मृती दिनानिमित्ताने आयोजित 'गुरू-शिष्य' कला प्रदर्शनाच्या उद्‌घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. दसरा चौक येथील शाहू स्मारक भवन कला दालनात झालेल्या या कार्यक्रमास आर्किटेक्ट गजेंद्र साबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. दरम्यान, शहर डीवायएसपी प्रिया पाटील यांनी प्रदर्शनास भेट दिली.

डॉ. जाधव म्हणाल्या, कोल्हापूरला कलेची मोठी परंपरा आहे. आता बदलत्या काळाबरोबर कला शिक्षणही व्यापक झाले पाहिजे. इथे मोठी परंपरा असणारी महाविद्यालये आहेत, त्यांनी पदवी, पदव्युतर शिक्षण मिळाले पाहिजे. त्यासाठी प्रस्ताव द्या, त्यात काही त्रुटी असतील तर त्या दूर करून लवकरात लवकर अभ्यासक्रम कसे सुरू करता येतील ते पाहू, असेही त्या म्हणाल्या.

यावेळी चित्रकार दुर्गा आजगावकर यांना के. आर. कुंभार उपक्रमशील युवा कलाकार पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

स्वागत प्राचार्य अजेय दळवी, प्रास्ताविक प्राचार्य मनोज दरेकर, सूत्रसंचालन नागेश हंकारे यांनी केले. आभार विजय टिपुगडे यांनी मानले.

या प्रदर्शनात विजय टिपुगडे, अजेय दळवी, विलास बकरे, संतोष पोवार, मनोज दरेकर, बबन माने, नागेश हंकारे, अभिजित कांबळे, प्रवीण वाघमारे, गजेंद्र वाघमारे, पूनम राऊत, शुभम चेचर, दुर्गा आजगावकर, विजय उपाध्ये, राज इंचनाळकर, पुष्कराज मेस्त्री, सुदर्शन वंडकर, सर्वेश देवरुखकर, शैलेश राऊत, भाऊसो पाटील, रमजान मुल्ला, शुभम कुंभार, ज्ञानेश पोवार, प्रकाश मोहिते, राहुल रेपे, आरिफ तांबोळी, अनंत भोगटे, अजय ढवळे, ओंकार राऊत, देवयानी देवरुखकर, विवेक कवाळे, शशांक घाटगे यांच्या कलाकृतींचा समावेश आहे. हे प्रदर्शन दि. २१ मार्चपर्यंत सकाळी १० ते ८ वाजेपर्यंत सर्वांसाठी विनामूल्य खुले आहे.